# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/ ६०४

दिनांक : १७/६/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

**विषय : शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या बिंदूनामावली नोंदवही नवीन नमुन्यात तयार करणे व अद्ययावत ठेवणे याबाबत मार्गदर्शन शिबीर/कार्यशाळेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शासनाने बिंदूनामावली नोंदवही नमुन्यामध्ये बदल सुचविलेला असल्याने महाविद्यालये /संस्था यांना नवीन बिंदूनामावली तयार करताना ब-याचशा अडचणी येत आहेत. याबाबत मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग यांचे मार्गदर्शन घेण्याकरिता पुणे विद्यापीठामध्ये पुणे जिल्हयातील अनुदानित महाविद्यालयांकरिता शिबीर/कार्यशाळा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | दिनांक व वेळ | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | **संत नामदेव सभागृह**<br>(आर्टस फॅकल्टी)<br>पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७ | मंगळवार, दिनांक २५ जून, २०१३<br>दुपारी २.०० वाजता. | पुणे (ग्रामीण व शहर)<br>फक्त अनुदानित<br>महाविद्यालये |

पुणे जिल्हयातील कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्थांकरिता शिबीराची स्वतंत्र तारीख व वेळ नंतर कळविण्यात येईल.

आपल्या महाविद्यालयामध्ये बिंदूनामावली अद्ययावत ठेवण्यासंदर्भातील काम पहात असलेल्या दोन सेवकांस उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या खर्चाने शिबीरास/कार्यशाळेस उपस्थित राहण्यासंदर्भात योग्य त्या सूचना द्याव्यात, ही विनंती.

पुणे विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नाशिक व अहमदनगर जिल्हयातील अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांकरिता मा. सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नाशिक यांचे मार्गदर्शन शिबीर स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील तारीख व वेळ नंतर कळविण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

17/6/13
उपकुलसचिव
( आरक्षण कक्ष )

G:\pk 2013\Circulars.docx